# नियमित दिवाणी दावा क्र. २२/२०१६ मधील नि. ८६ वरील आदेश

**(पोपट बाळीशा ऐतवडे वि. रघुनाथ आनंदा कांबळे वगैरे)**

**CNR:MHSN**12-000097-2016

प्रस्तुत अर्ज वादी यांनी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक होणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादींविरुध्द वाटपाकरीता व हद्दी कायम करुन अतिक्रमण काढून मिळणेकरीता व मनाईकरीता दाखल केला आहे.

२. **वादींचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादी यांचे मालकीचे दावा कलम १ मध्ये नमुद मिळकत म्हणजे १) गट नं. १०००/अ याचे क्षेत्र हे. ०.२२ आर आकार रु. ०.९० पैसे अधिक पो. ख. ०.०३ आर या पुरा गट नंबरची मिळकत तसेच वादी यांचे मालकीचे २) गट नं. १००० ब याचे क्षेत्र हे. ०.६१ आर आकार रु. २.५० पैसे या पुरा गट नंबरची मिळकत. तसेच वादी यांचे मालकीचे ३) गट नं. १००२ याचे क्षेत्र हे. ०.२२ आर या पुरा गट नंबरची मिळकत. सदर मिळकती ह्या वादी यांनी रघुनाथ तानाजी काटकर, विनायक रघुनाथ काटकर, वर्षाराणी रघुनाथ काटकर, विद्या रघुनाथ काटकर, सुभाष अपटे, सुरेखा शंकर काटकर यांचे कडून दि. ३०/०६/२००६ रोजी नोंदणीकृत दस्त नं. २१५६/२००६ ने खरेदी केलेल्या आहेत. सदर वर नमुद मिळकत कसताना वादी यांना लक्षात आले की, खरेदीपत्रावरील क्षेत्र व वस्तुस्थितीतील कब्जा क्षेत्रामध्ये बरीच तफावत आहे. खरेदीपत्रावरील क्षेत्रापेक्षा कब्जातील क्षेत्र कमी भरत आहे. यातील प्रतिवादी नं. १ ते ७ यांनी सदर मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले आहे अशी वादी यांची केस आहे. सदर दि. ३०/०६/२००६ रोजीच्या खरेदीपत्रातील नमुद क्षेत्राप्रमाणे गटाअंतर्गत मिळकतीची मोजणी होणे गरजेचे आहे. त्या करीता गट नं. १००० अ, गट नं. १००० ब व गट नं. १००२ याची एकत्रीत मोजणी तालूका भुमी अभिलेख पलूस यांचे मार्फत करुन मोजणी नकाशा व मोजणी अहवाल मागवणे पुराव्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. तालूका निरिक्षक भुमी अभिलेख पलूस यांची कोर्ट कमीशनर म्हणून करणे करिता प्रस्तुतवादी यांनी निशाणी ३९ कडे अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज मे कोर्टानी मंजूर केल्यानंतर त्याप्रमाणे निशाणी ४४ प्रमाणे कोर्ट कमिशन करिता उपाधीक्षक भूमी अभिलेख पलूस यांचेकडे रेट पाठवण्यात आले होते त्याप्रमाणे प्रस्तुत कोर्ट कमिशनर यांनी दिनांक

०८/०८/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे कोर्ट कमिशन अहवाल मी कोर्टात सादर केला आहे. परंतु सदर कोर्ट कमिशन अहवालात त्रुटी असल्याबाबत प्रस्तुत प्रतिवादी यांची हरकत आहे. त्याप्रमाणे त्याचा खुलासा कोर्ट कमिशनर यांचे कडून पुन्हा कोर्ट कमिशन करून होणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे पुन्हा कोर्ट कमिशन करण्यास प्रस्तुत प्रतिवादी यांनी दिनांक ११/०२/२०२५ रोजीच्या युक्तीवादाचे दरम्यान सहमती दर्शवलेली आहे. त्याप्रमाणे प्रस्तुतवादी सदरचा अर्ज दाखल करीत आहेत. सबब वादीची विनंती की, तालूका भुमी अभिलेख पलूस पत्ता: तालुका निरिक्षक भुमी अभिलेख पलूस, ता. पलूस, जि. सांगली यांनी भिलवडी येथील गट नं. १००० अ, गट नं. १००० ब व गट नं. १००२ याची एकत्रीत गटाअंतर्गत मिळकतीची मोजणी करुन सदर मिळकती मधून पाणीपुरवठ्याचे कॅनॉल गेले असल्याने त्याखाली गेलेले क्षेत्र सदर गटात समाविष्ट आहे, किंवा नाही व त्याखाली गेलेले क्षेत्र त्या गटातील आहे किंवा नाही, तसेच किती क्षेत्र गेले आहे याबाबत खुलासा करावा तसेच निशाणी ४४ सोबत दाखल केलेल्या अहवाल नकाशात उत्तरेकडील बाजूस रस्ता पण क्षेत्र हेक्टर ०–०५ आर क्षेत्र दर्शवलेली आहे. सदरचे क्षेत्र त्या गटातील आहे किंवा कसे तसेच त्याचा खुलासा करावा. त्याप्रमाणे सदरची मोजणी करताना निशाणी ४४ सोबत दाखल केलेल्या मोजणी नकाशाचा संदर्भ घेऊन म्हणजेच मोजणी रजिस्टर नंबर १७९/२०२२ चा नकाशा त्याचे अवलोकन करून त्याप्रमाणे पुन्हा नव्याने सुधारित कमिशन अहवाल सादर करण्यात यावा व तसे निर्देश तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना देण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे म्हणणे नाही आदेश करुन सदरचा अर्ज चालवण्यात आला.

४. प्रस्तुतचा अर्ज वाचला. वादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा अतिक्रमण काढून मिळाणेकरीता दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम २ प्रमाणे अतिक्रमित क्षेत्राबाबत वाद असल्यास वादातील क्षेत्राची मोजणी होवून असणारी वस्तुस्थिती पटलावर येणे आवश्यक आहे. दावा मिळकतींची पुन्हा मोजणी न झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वादाचे पूर्णपणे निराकरण होणार नाही. अशा परिस्थितीत दावा मिळकतीच्या पोट हिश्याची मोजणी होणे आवश्यक आहे.

६. वादीच्या कथनानुसार मोजणी मागविणे आवश्यक आहे. या दाव्याचा विचार करता अतिक्रमणा संबंधीचा वाद उपस्थित केला असल्यामुळे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, पलूस यांसारख्या तज्ञाद्वारे दावा मिळकतीची मोजणी केली असता दावा मिळकतीची वस्तुस्थिती रेकॉर्डवर येण्यास मदत होणार आहे.

७. तरी वरील गोष्टींचा सारासार विचार करता, सदर कामी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, पलूस यांची कोर्ट कमिशर म्हणून नेमणूक करुन त्यांचेमार्फत अर्जात नमुद केलेप्रमाणे मिळकतीची मोजणी करणे मला योग्य व रास्त वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## आदेश

१. वादीचा नि. ८६ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तालुका उप अधिक्षक, भूमी अभिलेख, पलुस यांची कोर्ट कमिशनर म्हणून मोजणीसाठी नियुक्ती करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी उभयपक्षांसमक्ष, अर्जामध्ये कथन केल्याप्रमाणे भिलवडी येथील गट नं. १००० अ, गट नं. १००० ब व गट नं. १००२ याची एकत्रीत गटाअंतर्गत मिळकतीची मोजणी करुन सदर मिळकती मधून पाणीपुरवठ्याचे कॅनॉल गेले असल्याने त्याखाली गेलेले क्षेत्र सदर गटात समाविष्ट आहे, किंवा नाही व त्याखाली गेलेले क्षेत्र त्या गटातील आहे किंवा नाही, तसेच किती क्षेत्र गेले आहे याबाबत खुलासा करावा तसेच निशाणी ४४ सोबत दाखल केलेल्या अहवाल नकाशात उत्तरेकडील बाजूस रस्ता पण क्षेत्र हेक्टर ०–०५ आर क्षेत्र दर्शवलेली आहे. सदरचे क्षेत्र त्या गटातील आहे किंवा कसे तसेच त्याचा खुलासा करावा. वादी यांचे खरेदी दस्त क्र. २१५६/२००६ प्रमाणे वादीचे ताब्यातील खरेदीपत्रातील नमूद क्षेत्राची मोजणी करुन त्यातील प्रतिवादींचे अतिक्रमण आहे किंवा कसे याचा खुलासा मोजणी करुन त्याचा खुलासा करावा. त्याप्रमाणे सदरची मोजणी करताना निशाणी ४४ सोबत दाखल केलेल्या मोजणी नकाशाचा संदर्भ घेऊन म्हणजेच मोजणी रजिस्टर नंबर १७९/२०२२ चा नकाशा त्याचे अवलोकन करून त्याप्रमाणे पुन्हा नव्याने सुधारित कमिशन अहवाल नकाशासह पूढील एक महिन्याच्या आत मे. कोर्टासमोर सादर करावा.

४. वादी व प्रतिवादी यांनी मोजणीसाठी लागणारी सर्व आवश्यक ती कागदपत्रे उप अधिक्षक, भुमि अभिलेख, पलुस यांचेकडे जमा करावी, तसेच वर नमूद मिळकतीच्या मोजणीसाठी लागणारी आवश्यक ती फी वादी व प्रतिवादी यांनी परस्पर संबंधित कार्यालयात भरावी.

५. वादी व प्रतिवादी संयुक्तीकरित्या प्रत्येकी १/३ प्रमाणे प्रोसेस फी जमा केल्यानंतर कमिशन प्रपत्र अदा करावे.

IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN

Digitally signed by IRFANALIKHAN YOUSUF ALI KHAN
Date: 2025.03.21 11:24:31 +0530

**पलूस** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**दिनांक– २०/०३/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पलूस**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. Jyoti A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 20/03/2025 |
| Signed by P. O. on | : | 20/03/2025 |
| Uploaded on | : | 21/03/2025 |